


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १६० ●मंगळवार, दि. ०९ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# मनोज जरांगेंची मोठी घोषणा! मराठा बांधवांना थेट तयारीला लागण्याचा आदेश; आता नवी मोहीम

**बीड । प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईत जाऊन पाच दिवस उपोषण केले. या उपोषणादरम्यान त्यांना पाठिंबा देण्यासाठी हजारो मराठा बांधून थेट मुंबईत धडकले होते. अपेक्षेपेक्षा जास्त आंदोलक मुंबईत गेल्यामुळे संपूर्ण दक्षिण मुंबई बंद पडली होती. प्रमुख रस्त्यांवर मराठा मोर्चेकरी दिसत होते. त्यानंतर सरकारनेही नमते घेत हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय जारी केला. मराठ्यांचा हा मोठा विजय असल्याचा दावा मनोज जरांगे यांनी केला आहे. दरम्यान, आता हे उपोषण यशस्वी झाल्यानंतर आता जरांगे यांनी मराठा बांधवांना एक



महत्त्वाचा आदेश दिला आहे. त्यांनी समस्त मराठा बांधवांना तयारीला लागा असा आदेशही देऊन टाकला आहे.

## ● नेमकी काय घोषणा केली आहे ?

मनोज जरांगे यांनी आज नारायण गडाला भेट दिली. यावेळी गुलाल उधळीत त्यांचे स्वागत करण्यात आले. गडावर जाऊन दर्शन घेतल्यानंतर त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी सरकारच्या शासन निर्णयामुळे मराठा समाजाच्या लेकरांचे कल्याण होणार आहे, असे सांगितले. तसेच आमचा यावेळी दसरा मेळावा होणार आहे, अशी घोषणाही त्यांनी केली. यावेळी त्यांनी मराठा बांधवांना जोमात तयारी लागा आणि दसरा मेळाव्याला जास्तीत जास्त संख्येने या असेही आवाहन केले.

## ● १०० टक्के दसरा मेळावा करायचा

या वर्षी दसरा मेळाव्याची तयारी करण्यासाठी आता फारसा वेळ नाही. मागच्या वर्षी आपल्याकडे वेळ होता. त्यामुळे मैदान साफ करता आले. या वर्षी मात्र फारसा वेळ नसल्याने जो छोटा-मोठा दसरा मेळावा होईल त्याची तयारी केली जाईल, असेही यावेळी जरांगे यांनी सांगितले. परंपरेनुसार आपण दसरा मेळावा १०० टक्के करायचा. तिथूनच सरकारला तुम्ही काय दिलं नाही आणि आम्ही तुमच्याकडून कसे घेतो हे सांगू, असा इशाराही जरांगे यांनी सरकारला यावेळी दिला.

## ● संपूर्ण मराठवाडा आरक्षणात जाणार

पुढे बोलताना त्यांनी सरकारने काढलेल्या शासन निर्णयावर भाष्य केले. सरकारच्या या निर्णयामुळे संपूर्ण मराठवाड्यातील मराठा हा आरक्षणात जाणार आहे. या निर्णयामुळे मराठ्यांचा फायदा होणार आहे. मी खचणार नाही. काही चूक झाली तर आणखी लढा द्यायला मी तयार आहे. सरकारचे काही चुकले तर सुधारित जीआर काढावा लागेल, असे आम्ही तेव्हाच कबूल करून घेतले होते, असे जरांगे यांनी स्पष्ट केले.

# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या सुगाव ता.अंबाजोगाई येथील तरुणाच्या कुटुंबियांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

### धनंजय मुंडेंकडून कुटुंबीयांना एक लाखांची तातडीची मदत, स्व. नितीन चव्हाण यांच्या दोन्ही मुलींच्या शिक्षणाची मुंडेंनी स्वीकारली जबाबदारी ; राज्य शासनाकडून मदत मिळण्यासाठी करणार पाठपुरावा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथील मराठा समाजातील तरुण नितीन माणिकराव चव्हाण यांनी ३० ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी गळफास घेऊन आत्महत्या केली होती ; माजी मंत्री तथा परळी मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज स्वर्गीय नितीन चव्हाण यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.



धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने श्री मुंडे यांनी मयत नितीन चव्हाण यांच्या कुटुंबियांना तातडीची एक लाख रुपयांची मदत केली असून, स्व नितीन चव्हाण यांना दोन मुली आहेत, त्या दोन्हीही मुलींच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी देखील धनंजय मुंडे यांनी स्वीकारली असल्याचे यावेळी कुटुंबियांना सांगितले. दरम्यान मराठा आरक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या मराठा सेवकांना राज्य शासनाच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड ते परळी रेल्वेमार्ग भूसंपादणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करा : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात लवकरच रेल्वे सुरु होणार असून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे. परंतू बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील भूसंपादनाबाबतचे अडथळे सर्व संबंधीत विभागानी दूर करून, भूसंपादन कामाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत उपविभागीय अधिकारी कविता



जाधव, सहा.कार्यकारी अभियंता मुकुंद पुं. नाईक, वरिष्ठ अभियंता सुरेश कुमार मंडल तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे उपविभागीय अधिकारी श्री. अरविंद लाटकर, श्रीमती वसीमा शेख, श्री. गौरव इंगोले यांनी बैठकीत सहभाग घेतला. जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले की, बीड ते परळी वैजनाथ रेल्वेमार्गाच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# लिंगायत जात नव्हे तर धर्म, जनगणनेत लिंगायत धर्माची स्वतंत्र नोंद करण्याची मागणी, तर बीडमध्ये मात्र विरोध



**बीड । प्रतिनिधी**

कर्नाटकमध्ये जातीय जनगणना सुरु होण्याआधीच लिंगायत समाजाने आम्हाला जात म्हणून नव्हे, तर स्वतंत्र धर्म म्हणून नोंदवा अशी मागणी उचलून धरली आहे. या आंदोलनाचे पडसाद आता महाराष्ट्रातही उमटताना दिसत आहेत. लिंगायत समाजाने २०१४ ते २०१९ दरम्यान कर्नाटक तेलंगणा आणि महाराष्ट्रात अनेकदा महामोर्चे काढले गेले होते ते याच मागणीसाठी. तीच जुनी मागणी पुन्हा नव्याने आंदोलनाचे रुप घेत आहे. या तिन्ही ठिकाणी असलेली या समाजाची संख्या निश्चितच राजकीय प्रभाव टाकणारी आहे.

महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात लिंगायत धर्माची स्थापना केली. याचा पाया समता, वैज्ञानिक दृष्टिकोन ▶▶ उर्वरित पान २ वर

# दोन दिवसापासून आजारी, पण उपचार मिळाला नाही ; नाशिकच्या आश्रम शाळेतील तिसरीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू



**नाशिक । प्रतिनिधी**

दोन दिवसांपासून प्रकृती खराब असतानाही वेळेत योग्य वैद्यकीय मदत न मिळाल्याने आश्रमशाळेत तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. नाशिकच्या कळवण तालुक्यातील चणकापूर शासकीय आश्रमशाळेत ही धक्कादायक घटना घडली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# मेंढया राखण्यासाठी सालगडी असलेल्या मुलाचा खून करुन पसार झालेलल्या आरोपीस एल. सी. बी. ने केले अटक

**पाटोदा । प्रतिनिधी**

दिनांक ०५/०९/०२५ रोजी फिर्यादी नामे गोपाळ भिमराव शिंगाडे धंदा मेंढपाळ रा. कासारी, तालुका नांदगाव जिल्हा नासिक यांनी पोलीस स्टेशन पाटोदा येथे फिर्याद दिली की, माझ्या कडे मेंढया राखण्यासाठी सालगडी म्हणुन दिपक केरा भिलाल हा होता. व आमचा नातेवाई शांतराम चंदु शिंदे यांचे कडे मेंढया राखण्यासाठी विलास एकनाथ मोरे हा सालगडी म्हणुन कामास होता. दिनांक ०४/०९/२०२५ रोजी आम्ही शिरुर तालुक्यातील



दगडवाडी शिवारात सायंकाळी सर्व मेंढया जाळीमध्ये बंदीस्त करुन जेवण करुन झोपलो. माझा सालगडी ▶ उर्वरित पान २ वर

# फिनिक्स पुरस्कारामुळे काम करण्याचे, जबाबदारी पार पाडण्याचे बळ द्विगुणित - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार संघाने दिलेला आणि गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते मिळालेल्या फिनिक्स पुरस्कारामुळे काम करण्याचे आणि पदाची जबाबदारी सांभाळण्याचे बळ द्विगुणित झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ▶▶ उर्वरित पान २ वर



# मराठा आरक्षणासाठी सर्वात मोठा पुरावा! कोल्हापूर गॅझेटमध्ये कुणबी अन् मराठ्यांची 'अशी' नोंद

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील उपोषणानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सातारा गॅझेट लागू करण्याचं आश्वासन राज्य सरकारने दिलेलं आहे. मात्र कोल्हापूर गॅझेटचा नवीनच मुद्दा पुढे येतोय. या गॅझेटमध्ये मराठा समाजासाठीचा मोठा पुरावा सापडला असल्याचं म्हटलं आहे.

मराठा आरक्षणप्रश्नी हैदराबाद आणि




सातारा गॅझेटची चर्चा मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यातच आता कोल्हापूर गॅझेटची चर्चा सुरु झाली आहे. कोल्हापूर गॅझेटियरमध्ये मराठा आणि कुणबी समाजाच्या ऐतिहासिक उल्लेखामुळे सध्या आरक्षणाच्या चर्चेत या कोल्हापूर गॅझेटला महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र या गॅझेटमध्ये छेडछाड केल्याचा आरोप देखील मराठा समाजातील नेत्यांनी केलेला आहे, नेमकं कोल्हापूर गॅजेटमध्ये काय म्हटले पाहूया.

मराठा आरक्षणासंदर्भातल्या लढाईत हैदराबाद, सातारानंतर आता कोल्हापूर गॅझेट पुढे आलेलं आहे. कोल्हापूर गॅझेटमध्ये मराठा आणि कुणबी एकच ▶▶ उर्वरित पान २ वर



*छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे संघर्ष योद्धा मा. मनोज दादा जरांगे पाटील यांची शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. व मराठा आरक्षणाच्या या लढ्यामध्ये महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील जीव गमावलेल्या मराठा बांधवांच्या वारसांना मदत मिळवून दिली याबद्दल त्यांचे आभार मानले.*

# येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बीड जिल्हात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा भगवा फडकवणयासाठी सज्ज व्हा: अंबादास दानवे

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आज महाराष्ट्र राज्याचे विधानपरिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव



साहेब, जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम,माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना मध्यवर्ती कार्यालय सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स बीड येथे सर्व जिल्हातील उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, उपतालुकाप्रमुख,शहरप्रमुख, विभागप्रमुख, शाखाप्रमुख व सर्व पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना,व अंगीकृत संघटनां व शिवसैनिक यांची अत्यंत महत्त्वाची बैठक घेण्यात आली.यावेळी शिवसैनिक व पदाधिकारी यांना मार्गदर्शन करताना अंबादास दानवे साहेब म्हणाले की , शिवसेना पक्ष हा फक्त शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मालकीचा असुन तो दुसरा कुणाचाच होऊ शकत नाही, त्यांनी दिलेल्या शिकवणीचे आपणं तंतोतंत पालन करत असुन त्यांनी सांगितल्या प्रमाणे पुढे आपण उद्धवसाहेब ठाकरे यांचे नेतृत्व मान्य केलेले आहे. लोकसभा

▶▶ उर्वरित पान २ वर



# सह्याद्रीच्या हृदयातील अभेद्य गड : प्रतापगड

सह्याद्रीच्या उंचसखल डोंगररांगांमध्ये, दाट जंगलांच्या कुशीत आणि नागमोडी घाटांच्या वळणावर अभिमानाने उभा असलेला प्रतापगड हा मराठा इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या गडाचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचसखल भौगोलिक रचनेत नाही, तर आजूबाजूच्या दऱ्या, खोऱ्या आणि घाटांवर ठेवलेल्या नियंत्रणातही दडलेले आहे. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध डोंगरी किल्ला म्हणून या किल्ल्याची ओळख आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैर्ऋत्येस १३ कि.मी. वर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची १,०९२ मी. आहे. पूर्वेकडील बाजूस ३४० मी. आणि पश्चिमकडे ८७० मी. खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर मोरो त्रिंबक पिंगळे यांना १६५६ मध्ये हा किल्ला बांधून घेण्याची आज्ञा दिली. प्रतापगड हा बालेकिल्ला आणि त्याच्या सभोवतालचा खालचा भाग, अशा दोन प्रमुख भागात विभागलेला आहे. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात राजवाडा, सदर, केदारेश्वर मंदिरे, पाण्याच्या टाक्या आणि धान्य-रसद साठवणीसाठीच्या कोठाऱ्या यांसारखी महत्त्वाची बांधकामे होती. तर दक्षिण व पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली तटबंदी आणि प्रचंड बुरुज शत्रूला दरीतच अडकवून ठेवण्यासाठी होती.

मुख्य किल्ला, माची आणि बालेकिल्ला असे या किल्ल्याचे तीन भाग होतात. मुख्य किल्ला व बालेकिल्ला भागांत तलाव असून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याच्या चोहोबाजूंस भक्कम तटबंदी व बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौ. मी., तर मुख्य किल्ल्याचे ३,८८५ चौ. मी असून दक्षिणेकडील बुरूज १० ते १५ मी. उंचीचे आहेत. त्यांपैकी रेडका, राजपहारा, केदार इ. बुरुजांचे अवशेष टिकून आहेत. बुरूज वैशिष्ट्यपूर्ण असून निमुळत्या डोंगर धारेच्या शेवटी आहे. या भागाला माची म्हणतात. कारण अशाच स्वरूपाचे बांधकाम राजगड (सुवेळा व संजीवनी), तोरणा ( झुंजार) या किल्ल्यांवरील माच्यांना आहे. किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल ४० फूट उंच असून तिच्या भक्कम रचनेमुळे प्रतापगड अभेद्य बनला होता. संपूर्ण बांधकाम काळ्या पाषाणात केले गेले आहे. गडाच्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातील डोंगर-दऱ्यांवर सतत नजर ठेवता येत असे, त्यामुळे शत्रूच्या हालचाली वेळेत ओळखणे सोपे होत असे. मुख्य किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे पार करून जावे लागते. दोन्ही दरवाजांवर शरभाच्या प्रतिमा दिसतात. दोन दरवाजे पार केल्यावर तुळजा भवानीचे मंदिर आहे. या देवालयासमोर दोन उंच दीपमाळा आहेत. त्या जवळच



नगारखान्याची इमारत आहे. भवानी देवीचे मूळ मंदिर दगडी गाभाऱ्याचे होते. १८२० मध्ये सातारच्या प्रतापसिंह महाराजांनी तेथे लाकडी मंडप बांधला.

अरुंद, नागमोडी चढणाऱ्या वाटा आणि दारांच्या पुढे लपवलेले मजबूत अडथळे यामुळे कुणालाही सरळपणे गडावर प्रवेश करणे शक्य नव्हते. महादरवाजा तर संरक्षणकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा रचनेत इतका कुशल होता की, अरुंद मार्गाने आत येणाऱ्या शत्रूंना दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून सहज हल्ल्याच्या टप्प्यात आणले जाई.

◆ पान १ वरून पुढे...

## मराठा आरक्षणासाठी...

वतीने आर्थिक मदत करण्यात आली असून, स्व. नितीन चव्हाण यांच्याही कुटुंबीयांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी आपण मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. या प्रसंगी धनंजय मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण, तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, बबन लोमटे, आबा पांडे, विलास बापू मोरे, अजित गरड, रणजित लोमटे, प्रवीण जगताप, गुणवंत आगळे, उपसरपंच गणी भाई, नामदेव शिंदे यांसह पदाधिकारी तसेच ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक आदी उपस्थित होते.

## बीड ते परळी....

भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे सर्व संबंधीत विभागाने समन्वय साधून तातडीने निकाली काढून रेल्वे मार्गासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. राष्ट्रीय राज्यमार्ग विभागाने ब्रम्हवाडी येथील उड्डानपूलाचे काम लवकरात लवकर सुरु करावे. तसेच सर्व संबंधीत उपविभागीय अधिकारी यांनी भूसंपादना बाबतची प्रक्रिया वेळेत पूर्ण करुन अहवाल सादर करावा, असे निर्देश दिले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली बीड रेल्वे स्थानकाची पाहणी: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज बीड येथील रेल्वे स्थानकास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करत येथील कामांची माहिती घेतली. यावेळी श्री. जॉन्सन यांनी दि. १७ सप्टेंबर रोजी बीड ते परळी रेल्वेमार्गाच्या उद्घाटनाच्या अनुषंगाने संबंधित विभागांस योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. तसेच रेल्वे स्थानकातील सर्व सुविधाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी श्री जॉन्सन यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, उपमुख्य अभियंता डी.डी. लोळगे, कार्यकारी अभियंता मध्य रेल्वे अहमदनगरचे लोकेंद्र कुमार सिंग, वरिष्ठ अभियंता एल.पी. नायक, वरिष्ठ अभियंता अमरकुमार अकेला, वरिष्ठ अभियंता सुरेश कुमार मंडल यांची उपस्थिती होती.

## लिंगायत जात नव्हे....

आणि वेदविरोधी विचार होता. इष्टलिंग धारण करुन पूजा करण्याची नवी पद्धत रुढ झाली. ३५० हून अधिक जातींचे लोक यात सामील झाले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात जनगणनेत लिंगायतांचा स्वतंत्र धर्म म्हणून उल्लेख आढळतो.

लिंगायत धर्मातील वेगळेपण

हिंदू धर्मापासून भिन्न: हा धर्म अवैदिक मानला जातो.

संस्कार पद्धती वेगळी: लिंगायत, मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मासारखाच दफनविधी, सुतक पद्धती नाही: जनन, मरण, उच्छिष्ट, जाती, रजस्व अशा सुतकांचे पालन नाही

समता: जातपात नाकारून सर्वांना एकसमान मान्यता.

का नाही मिळाली मान्यता? भारतात शीख, बौद्ध, जैन, मुस्लिम, ख्रिश्चन अशा अल्पसंख्यांक धर्मांना मान्यता आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात शीख जैन आणि लिंगायत यांचा उल्लेख स्वतंत्र धर्म म्हणून होता स्वातंत्र्यानंतर या तीन धर्माची मान्यता काढून घेण्यात आली. शिख आणि जैन धर्मीयांच्या संघर्षानंतर त्यांना मान्यता दिली लिंगायत ती मान्यता देण्यात आली नाही.

प्रमुख मागण्या काय? १. लिंगायत धर्माला संवैधानिक मान्यता द्यावी

२. लिंगायतांना धार्मिक अल्पसंख्यांक वर्गात सामाविष्ट करावे.

३. राष्ट्रीय जनगणनेत लिंगायत धर्माची स्वतंत्र नोंद घ्यावी.

लिंगायत समाजाला वेगळा धर्म म्हणून मान्यता देण्यास बीडच्या लिंगायत

◆ पान १ वरून पुढे...

समाजाचा विरोध - कर्नाटकमध्ये एकीकडे लिंगायत समाजाला वेगळा धर्म म्हणून मान्यता देण्याची मागणी केली जात असतानाच, बीडमध्ये मात्र लिंगायत समाजातील नागरिकांनी याला विरोध केल्याची दिसून येत आहे. लिंगायत हा हिंदू धर्माचा अविभाज्य घटक म्हणून राहिलेला आहे. लिंगायत धर्मातील चाली रूढी परंपरा हिंदू धर्माप्रमाणेच आहेत. मात्र महात्मा बसवेश्वरांनी हिंदू धर्मातील अनिष्ट रूढींना विरोध करण्यासाठी या पंथाची स्थापना केली असल्याचे लिंगायत समाज बांधवांकडून सांगण्यात आले आहे. आमचा देव महादेव असून शैव पंथाचाच एक प्रकार आहे. आम्हाला कुठल्याही वेगळ्या धर्माची गरज नाही. आम्ही हिंदू म्हणूनच जन्मलो आणि हिंदू म्हणूनच मरणार असल्याची भूमिका घेतली आहे. लिंगायत धर्म म्हणजे हिंदू धर्मातीलच वेगळा विचार आहे लिंगायत हिंदू दूध साखरेप्रमाणे एक झालेले आहेत. दिवाळी गणेशोत्सव महालक्ष्मी सगळे उत्सव साजरा करतो, आम्हाला हिंदू धर्माबद्दल अभिमान आहे. निवडणुका आले की असे प्रकार केले जातात. जात धर्माबाबत वाद निर्माण करणे हा निंदनीय प्रकार आहे. मुघलांच्या काळात असे प्रकार केले गेले. आम्ही हिंदूशी एकरूप झालेलो आहोत. वेगळा लिंगायत धर्म मागण्यामागे राजकारण आहे. लिंगायताला वेगळा धर्म म्हणून मान्यता मागणे चुकीचे असल्याचे बीडम धीलनागरिकांनी म्हटले आहे. लिंगायत म्हणजे हिंदू धर्मातील एकेश्वर देववादी पंथ आहे, आम्ही भगवान शंकराचे भक्त आहोत म्हणून आम्ही हिंदू समाजातील सगळ्या रूढी परंपरा पाळतो. हिंदू धर्मात असलेला सांप्रदाय म्हणजे लिंगायत आहे. स्वातंत्र्यानंतर हिंदू आणि लिंगायत एक धर्म झालेला आहे. १२ व्या शतकापासून महात्मा बसवेश्वरांनी समानतेसाठी प्रयत्न केले होते. कर्नाटकातील काँग्रेस सरकारने ही स्वतंत्र धर्माबाबतचा वाद निर्माण केला आहे.

## दोन दिवसापासून...

रोहित बागुल असे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. संतापजनक बाब म्हणजे रोहितच्या मृत्यूनंतर मृतदेह तब्बल पाच तास मुख्याध्यापकांच्या टेबलावर पडून होता. रोहितची प्रकृती दोन दिवसांपासून बिघडली होती. परंतु योग्य वेळी वैद्यकीय मदत न मिळाल्याने त्याचा जीव गेल्याचा आरोप पालकांनी केला आहे. आश्रम शाळेचे अधीक्षक संजय नांदणे हे या काळात रजा टाकून गायब होते, तर मुख्याध्यापक बालाजी भुजबळ हे कार्यालयात अनुपस्थित होते. त्यांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याचे उघड होताच दोघांचे तात्काळ निलंबित करण्यात आलं आहे. या घटनेनंतर पालकांनी शाळेसमोर मोठ्या संख्येने जमून संताप व्यक्त केला. रोहितच्या मृत्यूस दोषी असलेल्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. दोषींवर कारवाई झाली नाही तर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. नाशिकमधीलच नव्हे तर राज्यातील बहुतांश आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थी सुरक्षित नाहीत हे या प्रकरणाने अधोरेखित केले आहे. दरम्यान, या प्रकरणाची आदिवासी आयुक्त कार्यालयाने गंभीर दखल घेतली आहे.

## मेंढया राखण्यासाठी...

व शांताराम शिंदे यांचा सालगडी विलास मोरे हे एकमेकाचे बाजुला काही अंतरावर झोपले होते. दिनांक ०५/०९/२०२५ रोजी पहाटे ०३.३० वा सुमारास किंचाळण्याचा मोठा आवाज, दगड पडल्याचा आवाज आल्याने आम्ही आम्ही झोपेतुन जागे होवुन पाहिले असता दिपक भिलालाच्या डोकयातुन रक्त येत होते. व त्याचे बाजुला विलास मोरे उभा होता व तो काही तरी पुटपुटत रागाने बगत होता. त्यावेळी आम्ही विलास तु काय केलेस असे म्हणताच तो त्याठिकाणी त्याचे कडील मोबाईल, इतर साहित्य टाकुन पळुन गेला व विलास एकनाथ मोरे याने त्यास अज्ञात कारणावरुन डोक्यात दगड टाकुन त्यास जिवे ठार मारले वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन पोलीस स्टेशन पाटोदा गुरंन २७७/२०२५ कलम १०३ भा. न्या. सहिता २०२३ अन्वये

◆ पान १ वरून पुढे...

गुन्हा दाखल झाला होता. त्यावरुन मा.पोलीस अधीक्षक सो, बीड, यांनी नमुद गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिल्याने पोलीस निरीक्षक श्री शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी पोलीस उप-निरीक्षक श्रीराम खटावकर व अमंलदार याचे पथक तयार करण्यात आले. नमुद पथकातील अधीकारी व अमंलदार यांनी गुन्हा घडल्यापासुन आरोपीचा वेगवेगळया ठिकाणी शोध घेण्यात आला. आज दिनांक ०८/०९/२०२५ रोजी नमुद अरोपीचा शिरुर, चकलंबा, हद्दीमधील डोंगरमाळ रानामध्ये शोध घेत असतांना गोपनिय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम आनंदगाव शिवारातील डोंगर परीसरामध्ये फिरत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोलीस उप-निरीक्षक श्रीराम खटावकर व पथकामधील अमंलदार यांनी आनंदगाव शिवारातील डोगरमाळ परीसरात जावुन आरोपीचा कसोशीने शोध घेतला असता तो मिळुन आला आहे. सदर आरोपी नामे विलास एकनाथ मोरे रा. निमगांव ता. वैजापुर जि. संभाजीनगर यास पुढील तपास कामी पोलीस स्टेशन पाटोदा यांचे स्वाधीन केले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन पाटोदा येथील अधिकारी करत आहेत. सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक, श्री. सचिन पांडकर, मा. पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक श्रीराम खटावकर, पोह/ अशोक दुबाले, पोह/ सोमनाथ गायकवाड, पोह/बाळु सानप, पोकॉ / अश्पाक सय्यद, पोकॉ / मनोज परजणे, पोकॉ/अर्जुन यादव, अश्विन सुरवसे, पोकॉ/ सुनील राठोड, पोकों/सिध्देश्वर मांजरे यांनी केली आहे.

## फिनिक्स पुरस्कारामुळे....

मराठी पत्रकार संघाच्या वतीने येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित कार्यक्रमात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फिनिक्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांच्या जीवनावर आधारित व्हिडिओ बुकचे प्रकाशन करण्यात आले. या पुरस्कार सन्मानाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. जेव्हा आपल्या हातून एखादे सत्कार्य घडते, तेव्हा त्याचा गौरव स्वीकारावा असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारणे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. पत्रकार संघाचे आणि संपादक मंडळाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. हा सोहळा अत्यंत नीटनेटका, कल्पकतेने सजलेला आहे. पत्रकार आणि राजकारणी हे लोकशाहीच्या गाड्याची दोन चाके आहेत. ही दोन चाके एकमेकांसोबत चालली तरच लोकशाही योग्य रुळावर राहते. टीका करणे हा पत्रकारांचा अधिकार आहे, पण त्याच वेळी आमची बाजूही ऐकून घ्यावी. लोकशाही प्रगल्भ होण्यासाठी पत्रकारितेचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे. पत्रकारांना भेडसावणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी सरकार नेहमीच त्यांच्या पाठीशी आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात पत्रकारिता अधिक कठीण झाली आहे. कोविडनंतर तर आव्हान अधिक वाढले. पत्रकार दिवस-रात्र रस्त्यावर असतात. हा लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ मजबूत राहावा म्हणून सरकारकडून शक्य ती सर्व मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## मराठा आरक्षणासाठी...

आहेत, असा उल्लेख असल्याचा दावा अभ्यासक करीत आहेत. गॅझेटमध्ये मराठा आणि कुणबी यांच्या संदर्भात असलेले उल्लेख आणि लोकसंख्या मराठा आरक्षणासाठी योग्य दिशा देणारी असेल, असंही म्हटलं जातंय. गॅझेटमध्ये नेमकं काय?

१८८१साली ब्रिटिशांनी लिहिलेल्या कोल्हापूर गॅझेटमध्ये कोल्हापूर जिल्ह्याचा इतिहास, भौगोलिक रचना, लोकजीवन, समाजव्यवस्था आणि परंपरा यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे ब्रिटिश

◆ पान १ वरून पुढे...

काळापासून कोल्हापूर गॅझेट हे अधिकृत दस्तऐवज मानले जात आहे. मराठा आणि कुणबी समाजाच्या उत्पत्ती व जीवनशैलीबाबत कोल्हापूर गॅझेटमध्ये स्पष्ट उल्लेख आढळतो. कुणबी समाज हा महाराष्ट्रातील प्राचीन शेतकरी समाज आहे. जमीन कसणे, धान्य उत्पादन करणे ही त्यांची मुख्य ओळख दिलेली आहे. तर मराठा समाजाचा उल्लेख योद्धा, पराक्रमी आणि लढाऊ परंपरा असणारा समाज असा करण्यात आला आहे. पण त्याचबरोबर गॅझेटियरमध्ये मराठे हे मूलतः कृषीप्रधान कुणबी समाजातूनच उदयास आले असेही संदर्भ आहेत. याचा अर्थ सामाजिक व ऐतिहासिक स्तरावर मराठा आणि कुणबी एकच असल्याचे पुरावे या गॅझेटमध्ये नमूद केले आहेत. मराठा समाज समन्वयक आणि प्रजासत्ताक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी याबाबत माहिती दिली आहे. साली ब्रिटिशांनी कोल्हापूर गॅझेटची निर्मिती केली आहे. मात्र १९९६ साली राज्य शासनाच्या एका कमिटीने याच गॅझेटमध्ये बदल केल्याचा आरोप मराठा समाजातील नेत्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन केलेला आहे. १८८१ च्या गॅझेटनुसार मराठा समाजाची लोकसंख्या ६२ २८७ तर कुणबी समाजाची लोकसंख्या दोन लाख ९९ हजार ३५० इतकी होती. दरम्यान १९९६ साली याच गॅजेटमध्ये परंपरेने मराठा व कुणबी यांच्यात मिश्र विवाह होत नाहीत, तथापि त्यांच्यातील मतभेतांची तीव्रता खूपच कमी झालेली दिसते, असं वादग्रस्त विधान करून त्या गॅझेटमध्ये छेडछाड केल्याचा आरोप सकल मराठा समाजाच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन करण्यात आला आहे.

## येणाऱ्या स्थानिक...

निवडणूकीत आपल्याला भरघोस यश मिळाल्याने हे सरकार खडबडून जागे झाले व पुढे विधानसभा निवडणुकीत पेट्या कशा मॅनेजमेंट करायच्या व विधानसभा निवडणुकीत कसा विजय संपादन करायचा हे षडयंत्र ठरविण्यात आले व मतदान चोरुन हे पुन्हा सत्तेवर बसलेले आहेत . शिवसैनिक बांधवांनो आता गाफिल राहू नका, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला कसल्याही परिस्थितीत जिंकायच्या आहेत, महविकास आघाडी करायची की नाही ते पक्षप्रमुख व आघाडीचे नेते ठरवतील पण आज मात्र आपल्याला सर्व जागा लढवायच्या आहेत असे समजून प्रथेक जि.प. गट व गण व प्रथेक प्रभागांमध्ये जाऊन लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील रहा , सुखदु:खात मिसळत चला, आपल्या लढायचय व जिंकायचयच अशी खुणगाठ बांधा ,एकेकाळी बीड जिल्हा हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्रात ओळख होती हा जाज्वल्य इतिहास या जिल्हाला आहे, बीड मधुन तीन वेळेस शिवसेनेचा आमदार लोकांनी निवडून दिलेला आहे म्हणून नव काहीच नाही आता फक्त पुन्हा एकदा आपल्याला फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घ्यावी लागेल व दरम्यानच्या काळात या सरकारच्या फसव्या घोषणा लोकांना सांगा , शेतकरी कर्जमाफी का केली नाही , लाडकी बहिण योजना कशी फसवी आहे, एक रुपयात पीक विमा का बंद केला, अंगणवाडी सेविकांनी पगारवाढ का दिली नाही असे अनेक फसव्या योजनांची माहिती लोकांना सांगा व निवडणुकीत यश संपादन करायचेच या ईर्षेने कामाला लागा नक्कीच पुन्हा एकदा बीड जिल्हा भगवामय झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास वाटतो. यावेळी संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम पाटील, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर,यांचीही समायोजित भाषणे झाली. या बीड जिल्ह्यातील बैठकीला सहाही विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे सर्व महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका, युवासेनेचे युवाआधिकारी , उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, उपतालुकाप्रमुख, विभागप्रमुख, सर्कलप्रमुख, शाखाप्रमुख व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले.

◆ पान ४ वरून पुढे...

## रुईमध्ये मुलाबाळांसह...

हातात दांडा, लोखंडी रॉड आणि लोखंडी पाईप होता. तुझा मुलगा सुरेंद्र कोठे आहे ? असे म्हणत कालिदास नवले याने त्याला मारहाण केली. सून वैष्णवी हिला पण त्याने ढकलून दिले. नातू श्रीतेज या अडीच वर्षाच्या मुलाला योगेश याने पायाखाली दाबले आणि याला जिवंत मारून टाकतो असे म्हणाला तेव्हा वैजयंती बाई नवले, त्यांचे पती आणि सून यांनी मारू नका अशी हात जोडून त्यांना विनंती केली. तेव्हा त्या मुलाला सोड, सुरेंद्रचा काटा काढायचा आपल्याला असे कालिदास, योगेश व प्रशांत हे तिघेजण सुरेंद्रला जीवे मारण्याच्या उद्देशाने महाराणीच्या धमक्यात देऊ लागले. आम्ही आरडा ओरड केल्याने तेथे गावकरी आले आणि त्यांनी माझ्या मुलाला त्यांच्या तावडीतून सोडले. तेव्हा कालिदास मनाला तुझ्या पोराला समजून सांग गावामध्ये फक्त मीच आहे. माझ्याशिवाय दुसरे कोणीही राजकारण करु नये. नसता मी जिवंत ठेवीत नसतो. तुझ्या मुलाचा खून करेल. माझे काहीही वाकडे होत नाही. असे म्हणून प्रशांत व योगेश यांनी पण शिवीगाळ केली. धमक्या दिल्या आणि निघून गेले. आमच्या गावामध्ये वरील लोकांची खूप दहशत आहे ते गुंड आहेत. त्यांच्या भीतीपोटी आम्ही काल रात्री पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलो नाहीत मात्र आज आम्ही तक्रार देण्यासाठी आलो असल्याचे वैजयंतीबाई नवले यांनी तलवाडा पोलीस स्टेशन गाठून वरील प्रमाणे तक्रार दिली. या तक्रारीनुसार तलवाडा पोलीस ठाण्यात कालिदास माणिक नवले, योगेश राम नवले आणि प्रशांत ज्ञानेश्वर नवले यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ३३२ (ल), ११८ (१), ११५, ३५२, ३५१ (२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणपती विसर्जनाच्या दिवशी झालेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## हरित बीड अभियानाला ...

◆ पान ४ वरून पुढे...

स्वामी यांच्या हस्ते नगरपरिषद मुख्याधिकारी, वन विभागीय अधिकारी यांच्यामार्फत पालकमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, वनमंत्री गणेश नाईक आणि कारागृह विशेष महानिरीक्षक यांना देण्यात आले. आंदोलन स्थळी पोलिस बंदोबस्त म्हणून एपीआय गजानन क्षीरसागर,पोह.संतोष राऊत, सुनिल राठोड, सुनिता राठोड, मपोह. सुनंदा गुळवे यांची उपस्थिती होती. निदर्शनावेळी अशोक येडे, जिल्हाध्यक्ष (आप)रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), वृक्षप्रेमी अभिमान खरसाडे, डी .जी.तांदळे (अध्यक्ष म.रा.किसानसभा बीड),नितिन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच), सय्यद सादेक बीड शहराध्यक्ष (आप),सुदाम तांदळे, शेख मुबीन ,आदी मान्यवर उपस्थित होते.

## आदिवासी विकास...

संचलित परळी येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख असून त्यांच्या नियुक्तीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष तथा संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. प्रा.डॉ.हमराज उईके यांनी नियुक्तीनंतर मंत्री कार्यालयात रुजू होऊन कार्यभार स्वीकारला. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिलेले आहे. 'भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका' या विषयावर नुकतेच बीडमध्ये आंतरराष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्राचे निमंत्रक म्हणून त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांची शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यतत्परता लक्षात घेता आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी प्रा.डॉ.हमराज उईके यांच्यावर 'ओएसडी' पदाची जबाबदारी दिली असून, त्यांच्या नियुक्तीमुळे विभागाचे कार्य अधिक वेगवान व परिणामकारक होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच, नियुक्तीबद्दल प्रा.डॉ.हमराज उईके यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## सामाजिक कार्यकर्ते...

अधिकारी आदरणीय जीतीन रहेमान साहेब, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी आदरणीय मेश्राम मॅडम, उपशिक्षणाधिकारी आदरणीय जमीर शेख सर , इतर मागास प्रवर्ग विकास विभागाचे संचालक दत्तात्रय क्षिरसागर,संध्याताई राजपूत,भटक्या विमुक्त विकास परिषदेचे देवगिरी प्रांत संयोजक उमेश जोगी, सामाजिक कार्यकर्ते ओमप्रकाश गिरी, ॲड जाधव, बालाजी पवार, दादासाहेब नन्नवरे यांच्यासह मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. केज तालुक्यातील मौजे जोला येथील भुमिपुत्र बाजीराव नवनाथ ढाकणे हे ऊसतोड कामगार, स्थलांतरीत कामगार विटभटी कामगार, भटके विमुक्त समाजातील लोक व एकल महिला व बालकांच्या हक्कांच्या संदर्भात करत असलेल्या सामाजिक कार्याच्या १५ वर्षाच्या प्रदिर्घ कार्याची दखल घेऊन रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय भटके विमुक्त दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात श्री बाजीराव नवनाथ ढाकणे यांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय जितीन रहेमान साहेब व निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले समग्र वाड्मय ग्रंथ, शाल, श्रीफळ देऊन सन्माननीत करण्यात आले .

## हैदराबाद गॅझेटनुसार...

असा इशाराही रामशेठ राठोड यांनी दिला. या मागणीला समाजातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. तरुण वर्गाने सोशल मीडियावरून समर्थन दिले असून, अनेकांनी ठिकठिकाणी बैठका घेऊन आपला पाठींबा जाहीर केला आहे. आमच्या भावी पिढ्यांना न्याय मिळावा यासाठी आम्ही एकदिलाने सरकारकडे मागणी करतो, असे मत बंजारा समाजातील युवकांनी व्यक्त

◆ पान ४ वरून पुढे...

केले.रामशेठ राठोड यांच्या पुढाकारामुळे आता बंजारा समाजात आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. या मागणीला राजकीय पातळीवरही महत्त्व प्राप्त होत असून, लवकरच राज्य सरकारसमोर हा प्रश्न गंभीरतेने मांडला जाणार आहे.

## दिलासा संस्था यवतमाळ...

पर्यंत पोहचणे आणि शेती आणि मशागतीला होणारा खर्च तसेच शेतकऱ्यांचे मानसिक ताण कमी करण्याच्या उद्देशाने हिंगणी बु, बोडखा, तांदळवाडी, निमला आणि गावंदरा या गावात २०२३ पासून किसान सेवा केंद्र या मुख्य उद्देशाच्या माध्यमातून ट्रॅक्टर आणि अवजारे सेवा उपलब्ध करुन देत असून गेली दोन वर्षाच्या सखोल अभ्यासातून आणखीन शेतकरी सहाय्य आणि शेतकऱ्यांना विविध उपक्रम च्या माध्यमातून लाभ देण्यासाठी पुन्हा एस बी आय ग्राम सक्षम प्रकल्पाला पुढे घेऊन जात आहे. या सर्व उपक्रमांना बळ दिले आहे एस बी आय फाउंडेशन मुंबई यांनी तसेच श्री सिद्धलिंगेश सर, किरण सर, संस्थेतून मा. विजयाताई धस यांनी. निश्चितच या प्रकल्पातून गरजू आणि गरीब शेतकऱ्यांना लाभ मिळत आणि आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यात मदत होत आहे. पूर्ण परिसरातील शेतकरी आणि समुदायाकडून आभार मानले जात आहे.

## बीड शहरात ...

यांनी नागरिकांना त्यांच्या भाषेत कीटकजन्य आजारांबाबत माहिती दिली. सर्व गणेश मंडळांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, लोकांनीही स्वच्छतेच्या या उपक्रमात सहभाग नोंदवला. आरोग्य विभागाच्या या उपक्रमामुळे गणेशोत्सवाच्या काळात डेंगू, हिवताप व चिकनगुनियावर नियंत्रण मिळवण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## अप्पर कुंडलिका धरणातून तिगाव, चिंचोटी, मामला साठवण तलावात पाणी न सोडल्यास १७ सप्टेंबरपासून उपोषण करणार : ॲड. राज पाटील



**वडवणी । प्रतिनिधी**

मराठवाडा काही भाग सध्या दुष्काळाच्या झळा सहन करत आहे. शेतकरी धरणात पाणी नसल्याने हवालदिल झाले आहेत. उन्हाळ्यात गावोगाव शेतीला व पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होणार आहे. अशा गंभीर परिस्थितीत बीड जिल्ह्यातील माजलगाव, सोनाखोटा, ऊपळी धरणासह जवळजवळ ९० टक्के धरण १०० टक्के भरलेले आहेत. परंतु वडवणी तालुक्यातील चिंचोटी, मामला, तिगाव साठवण तलाव अद्याप ५०% च्या आसपास आहेत. मागील दोन महिन्यापासून वरील गावातील लोक जिल्हाधिकारी, आमदार व पाटबंधारे विभागाकडे अप्पर कुंडलिका धरणाचे पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करत आहेत. परंतु प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत लढा दुष्काळाशी फाउंडेशन महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष ॲड. राज पाटील यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिन पर्यंत वरील धरणात पाणी न सोडल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हजारो नागरिकासह उपोषण करण्याची भूमिका घेतली आहे. शंभर टक्के भरलेल्या अप्पर कुंडलिका धरणातून पाणी सोडण्याची मागणी मागील तीन महिन्यापासून सातत्याने केली जात असताना, माजलगाव धरण भरले नसल्यामुळे आतापर्यंत पाणी सोडले नाही परंतु आता माजलगाव सह इतर सर्व धर्म शंभर टक्के भरलेले असताना चिंचोटी, तिगाव आणि मामला धरणात पुरेसे पाणी साठा नसतानाही शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून दिले जात नाही. भविष्यात पिके वाचवण्यासाठी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने धरणातून पाणी सोडावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

# सामान्य जनता आणि कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही : अमरसिंह पंडित



### धम्मपाल सौंदरमल यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश

**गेवराई । प्रतिनिधी**

शिवछत्र परिवार परिवारावर विश्वास टाकून गेवराई तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत, त्या सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन गेवराई शहराचा चेहरा मोहरा बदलायचा आहे. कार्यकर्त्यांबरोबरच सामान्य माणसांच्या अडचणीच्या काळात उभा राहणार शिवछत्र परिवार आहे. सामान्य जनता आणि कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला जाणार नाही. कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करून येणाऱ्या काळामध्ये गेवराई नगर परिषदेत आपली सत्ता आणण्यासाठी प्रामाणिकपणे काम करावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई शहरातील धम्मपाल सौदरमल यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला यावेळी ते बोलत होते.

गेवराई शहरातील धम्मपाल सौदरमल यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाला सभापती मुजीब पठाण, गणेश वडघने, प्रभाकर पिसाळ, रविंद्र बोराडे, संतोष सुतार, शामकाका येवले, खाजा मामु, जे.के.बाबुभाई, मनोज हजारे, कृष्णा मुळे, बंटी सौदमल, सय्यद सुभान महादेव सौदरमल, मिलिंद सौदरमल, संतोष कांडेकर, लहुराज लोखंडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

गेवराई शहरातील धम्मपाल सौदरमल यांनी आपले असंख्य कार्यकर्ते भुषण जोगदंड, संदिप खरात, संतोष कांडेकर, भीमा सौदरमल, महादेव सौदरमल, संदीप खरात, मिलिंद सौदरमल, देवा गायकवाड, रवींद्र कांडेकर, सुनील शिंदे, मिलिंद सोनवणे, नितीन सोनवणे, अशोक पाटेकर, बॉबी माटे, यशराज भोले, संकेत बाळू कांडेक,आनिल टेलर, भगवान सौदरमल, अनिल कांडेकर, वसंत शिरसाट, सुरज शिरसाट, प्रमोद कांडेकर, गणेश शिरसाट, विश्वजीत संतोष सौदरमल, सत्यजित सौदरमल, सुमित सौंदरमल, नितीन पोपळभट, इमरान पठाण, विशाल भालशंकर, आप्पा निकम, प्रेम मिरपगार, बंडू वडमारे, पप्पू साळवे, नितीन काजळे, आली शेख, सागर अशोक लांडे आदींनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांनी केले. यावेळी प्रकाश भोले, महेश दाभाडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुशल कर्माचे फळ आनंद देऊन जाते : पूज्य भिक्खु धम्मशील थेरो

### महाविहार धम्मभूमी शिवनी येथे भाद्रपद पौर्णिमा महोत्सव उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था धम्मभूमी डॉ.भदंत आनंद कौशल्यायन मौजे शिवनी ता. जि. बीड येथे २०२१ साली स्थापन झाल्यापासून दर पौर्णिमेला नामवंत भिक्खु संघाची धम्मदेशना पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मदेशनेचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच विविध थरातील दानशूर, गुणवंत, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, प्रशासकीय अधिकारी, त्यांचा आदर्श समाजाने डोळ्यासमोर ठेवावा म्हणून सत्कार केल्या जातो व बीड परिसरात व संपूर्ण जिल्ह्यात धम्ममय वातावरण निर्माण करून धम्माचा प्रसार व प्रचार केला जातो. भाद्रपद पौर्णिमेचे औचित्य साधून भिक्खु धम्मशील थेरो आपल्या मधुर वाणीने अनेक उदाहरणे देऊन उपस्थित यांना समजावून सांगितले की कुशलकर्माचे फळ आनंद देऊन जाते. याप्रसंगी सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्प तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला दीप प्रज्वलन करून प्रमुख अतिथींच्या हस्ते अभिवादन करून त्रिवार वंदन करण्यात येऊन सर्व उपस्थिततांना पूज्य भन्ते यांनी त्रिशरण पंचशील दिले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील शेकडो उपासक उपासिकाची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष भास्कर सरपंच यांनी केले.

# गावकऱ्यांचे बेमुदत धरणे व जागरण गोंधळ आंदोलन



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर अतिवृष्टीची नोंद करून सरसकट अतिवृष्टीची एकरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठी समस्त ग्रामस्थांच्या वतीने दि.८ सप्टेंबर सोमवार पासुन बेमुदत धरणे व जागरण गोंधळ आंदोलनाला सुरूवात केली आहे.

गंगामसला महसुल मंडळात मोठ्या प्रमाणात पर्जन्यमान झाले असून संपुर्ण पिकांचे नुकसान झाले आहे, असे असताना या मंडळाची नोंद अतिवृष्टी म्हणून झाली नाही, याला कारणीभूत झोपेचे सोंग घेतलेले प्रशासनच आहे, कुंपणाने शेत खाल्ले तर दाद कोणाकडे मागणार ? अशी परिस्थिती झाली आहे, कारण गंगामसला परिसरात लावलेला पर्जन्यमापक खराब झाल्याने पावसाची नोंदच झाली नाही, आणि नोंद न झाल्यामुळे या परिसराची अतिवृष्टीत दखल घेतली गेली नाही, याला पूर्णतः प्रशासन जबाबदार असून फटका मात्र सामान्य नागरिकांना बसत आहे, तरी अतिवृष्टीची नोंद करून सरसकट अतिवृष्टीची एकरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई देण्यात यावी. शेतकऱ्यांचे संपुर्ण कर्ज माफ करावे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेने शेतकऱ्यांच्या बचत खात्याला केलेले स्थगित (होल्ड) हटविण्यात यावे, मोठेवाडी शिवारातील सरसकट पांदण रस्त्याचे मुरूम,खडीकरण करण्यात यावे या प्रमुख मागण्या बेमुदत धरणे व जागरण गोंधळ आंदोलनात करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात कॉ. सुदर्शन हिवरकर, भाई ॲड. नारायण गोले, ॲड. पांडुरंग गोंडे, प्रभाकर खेत्री, चक्रधर हिवरकर, ज्ञानेश्र्वर खेत्री, नामदेव यादव, जगन्नाथ खेत्री व समस्त गावकरी सहभागी झाले आहेत.

# प्राचार्य विष्णुपंत रसाळ पाटील सरांना दर्पण राष्ट्रीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२५ प्रदान

### प्राचार्य विष्णुपंत रसाळ सरांवर सर्वस्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील डॉ. पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विष्णुपंत सूर्यभानराव रसाळ पाटील सर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था( संघ) नाशिकच्या वतीने दर्पण राष्ट्रीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील डॉ. पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विष्णुपंत सूर्यभानराव रसाळ पाटील सर बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना मराठवाडा सहसचिव तसेच गणित अध्यापक मंडळ जिल्हा बीडचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यातील काम उल्लेखनीय आहे. यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल व घेतलेल्या अथक परिश्रमाची दखल घेऊन त्यांना शिक्षक दिनानिमित्ताने नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था( संघ) नाशिकच्या वतीने दर्पण राष्ट्रीय शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. या पुरस्काराचे एका भव्य दिव्य कार्यक्रमात रविवार दिनांक ०७ सप्टेंबर २०२५ रोजी माजी न्यायमूर्ती दिपकजी ढोलकिया, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ . महेंद्र देशपांडे यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य विष्णुपंत सुभानराव रसाळ पाटील सर यांचे संघर्ष योद्धा मराठा हृदयसम्राट मा. मनोजदादा जरांगे पाटील यांनी अभिनंदन केले. पुरस्कार मिळाल्याबद्दल सध्या त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शारदा प्रतिष्ठान गेवराईच्या वतीने देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्काराने हिवरा बुद्रुक जि प प्रा शाळेचे आगे ओमप्रकाश सन्मानित



**माजलगाव । प्रतिनिधी**

शारदा प्रतिष्ठान गेवराई च्या वतीने दरवर्षी आदर्श शिक्षकांची निवड करून त्यांना पुरस्कार दिले जातात त्यानुसार यावर्षीचा पुरस्कार माजलगाव तालुक्यातील हिवरा बुद्रुक येथील जि प प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री आगे ओम प्रकाश यांना देण्यात आला.

दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोदावरी सभागृह, र. भ. अट्टल महाविद्यालय येथे पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला या वेळी शारदा प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा. श्री. अमरसींह पंडित, सुप्रसिद्ध विचारवंत मा. श्री. इंद्रजीत देशमुख, गेवराई विधानसभेचे आमदार विजय सिंह पंडित आदींच्या उपस्थितीत जिल्ह्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षकांचा सन्मान करण्यात आला शारदा प्रतिष्ठान आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी आगे ओम प्रकाश पात्र झाले आणि तो सन्मान त्यांनी मिळवला त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे शारदा प्रतिष्ठानने दिलेला बहुमान मी कधीही विसरणार नाही या बहुमोल आणि अनमोल अशा पुरस्काराने माझे मनोबल आणखीन वाढले आहे पुरस्काराची गरिमा मी कधीच कमी होऊ देणार नाही आणि भविष्यात माझ्या हातून आदर्शवंत विद्यार्थी घडविण्याचे कार्य सुरूच राहील अशी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त ओम प्रकाश आगे यांनी सांगितले

# आष्टी–शिदेवाडी फाटा रस्ता खड्डेमय दोन किमी रस्त्यावर तब्बल १५०० खड्डे

### पन्नास गावांचे वाहनधारक, शाळकरी मुले, आयटीआय व एमआयडीसीचे प्रवासी दररोज धोक्यात

**● मतमोजणीचे केंद्र असलेला रस्ता खड्ड्यांच्या ताब्यात**



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहर ते शिदेवाडी फाटा या दोन किलोमीटरच्या रस्त्यावर तब्बल दीड हजार खड्डे पडल्याने प्रवाशांचा जीव मुठीत आला आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून वाहनधारक व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या रस्त्यावरून तब्बल पन्नास गावांतील वाहनधारकांना दैनंदिन प्रवास करावा लागतो. शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, कामगार व नोकरीसाठी जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे या रस्त्यावरच शासकीय आयटीआय महाविद्यालय तसेच एमआयडीसी परिसर आहे. दरवर्षी निवडणुकीदरम्यान याच शासकीय आयटीआयमध्ये मतमोजणी प्रक्रिया पार पडते. तरीसुद्धा या महत्त्वाच्या रस्त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. दुचाकीस्वारांना खड्डे चुकवताना तोल जाऊन अपघात होत आहेत, तर चारचाकी वाहनधारकांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा स्थानिकांनी प्रशासनाकडे तक्रारी नोंदवूनही अद्याप दुरुस्तीचे काम हाती घेतलेले नाही. ‘खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागतो. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून रस्ता दुरुस्त न केल्यास आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,’ असा इशारा स्थानिक नागरिक व वाहनधारकांनी दिला आहे.

# बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) आरक्षण लागू करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांचा पाठिंबा



**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील बंजारा समाजास हैद्राबाद गॅझेटच्या आधारे अनुसूचित जमाती (एस. टी.) आरक्षण लागू करण्याबाबत बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांना निवेदन दिले. बंजारा समाजाच्या मागणीला आ. विजयसिंह पंडित यांनी पाठिंबा दिला असून बंजारा समाजाच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभा असून बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याची ग्वाही देऊन बंजारा समाजाला न्याय देण्यासाठी विधानसभेत आवाज उठवणार असल्याचे आ. विजयसिंह पंडित म्हणाले तर बंजारा समाजाच्या मागणीसाठी आपण कायम बंजारा समाजाच्या सोबत असल्याचे माजी आमदार अमरसिंह पंडित यावेळी म्हणाले. बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी बंजारा समाजाची हैदराबाद गॅजेटनुसार एसटी प्रवर्गामध्ये समाविष्ट करावे या मागणीसाठी आमदार विजयसिंह पंडित यांना निवेदन दिले. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार अमरसिंह पंडित, सुंदरसिंग महाराज, विक्री संघ उपसभापती गणपत राठोड, माजी पं.स.सदस्य रोहिदास चव्हाण, उपसरपंच सुनील जाधव, माजी उपसंचालक रामेश्वर पवार यांच्यासह बंजारा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. कृष्णाई येथे बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांशी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, मायबाप बंजारा समाजाने मला कायदेमंडळात पाठवले आहे, त्यामुळे मी बंजारा समाजाला कधीही वा–यावर सोडणार नाही. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे मराठा समाजाला न्याय मिळाला, त्याचा फायदा बंजारा समाजाला मिळणार आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३३१/२०२५**

अर्जदार– १) सुरेखा न. सुरेशराव कुलकर्णी, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. काळा हुनमान ठाणा, बीड सध्या रा. अंकुश नगर, बीड, २) रेणुका भ्र. उपेंद्र जोशी, वय–४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. जैन गल्ली, जैन मंदीरासमोर, अंबाजोगोई ता. अंबाजोगाई जि. बीड. ३) सुधीर पि. सुरेशराव कुलकर्णी, वय ४० वर्षे, धंदा व्यापार, रा. शुक्रवार पेठ, रामदासी वाडाजवळ, बी.

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक — अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे सुरेश पि. काशीनाथ कुलकर्णी यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे सुरेश पि. काशीनाथ कुलकर्णी, रा. काळा हनुमान ठाणा, बीड ता. जि. बीड हे दिनांक १९/०७/२०२३ रोजी जिल्हा रूग्णालय, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ही मयताची मुलगी आहे व अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा आहे. मयताचे आई वडील ब–याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असंही म्हणणं आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिलं जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक २५/०९/२०२५

आज दिनांक ०३/०९/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

(मार्फत– ॲड. पंडीत आर. यु.)

शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक — (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २९२/२०२५

शेख मुस्तफा शेख इफ्तेखार विरुध्द मुख्या.न.प.बीड

पहा,

१. शेख मुस्तफा शेख इफ्तेखार, रा. पारांगण गल्ली, जुनाबाजार बीड, ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक शेख मुस्तफा शेख इफ्तेखार यांचा दिनांक १०/०६/१९९४ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहे न.प.बीड ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे न.प.बीड ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २९/०९/२०२५ ही आहे.

शिक्का — (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार, दि. ०९ सप्टेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन – भव्य धम्मध्वज रॅलीस लाखोंनी उपस्थित राहा : विजय दादा साळवे



**माजलगाव । प्रतिनिधी**

बुद्धगया (बिहार) येथील महाबोधी महाविहार बौद्ध धर्मीयांच्या ताब्यात देण्यात यावा, या मागणीसाठी बीड जिल्हा बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समितीच्या वतीने सातत्याने आंदोलन सुरू आहे. अनेक शतकांपासून सुरू असलेल्या या मागणीला नव्या पिढीतील परमपूज्य भंते विनयाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षभर अधिक बळ मिळाले असून, देशभरातून बौद्ध अनुयायी आणि बहुजन समाज या आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. तथापि, मनुवादी विचारसरणीच्या भारत सरकार आणि बिहार सरकारकडून हे पवित्र विहार बौद्ध धर्मीयांच्या ताब्यात देण्यास विलंब केला जात आहे, अशी तक्रार समितीने नोंदवली आहे. भारतातील प्रत्येक धर्माच्या धार्मिक स्थळांचे व्यवस्थापन त्या–त्या धर्मीयांच्या ताब्यात असताना, बौद्ध धर्मीयांच्या महाबोधी महाविहारावर इतर धर्मीयांचा ताबा राहिल्याने बौद्ध संस्कृती, परंपरा आणि आचारसंहिता दुर्लक्षित केली जात असल्याचे आंदोलनकर्त्यांचे मत आहे. भारताचे संविधान लागू होण्यापूर्वी १९४९ साली तयार करण्यात आलेल्या एका विशेष कायद्याच्या आधारे या विहाराच्या समितीत इतर धर्मीयांचा समावेश करण्यात आला आणि त्यानंतर बौद्ध परंपरा, विधी व संस्कृतीला बाधा पोहोचत असल्याचा आरोप समितीने केला आहे. राजकुमार सिद्धार्थ गौतम यांना ज्ञानप्राप्ती झालेल्या या ऐतिहासिक स्थळावरून इतर धर्मीयांचा कब्जा हटवून ते बौद्ध धर्मीयांच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी मंगळवार, दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता, बीड जिल्हा बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समितीच्या वतीने भव्य धम्मध्वज रॅली आयोजित करण्यात येत आहे. या रॅलीस सर्व बौद्ध अनुयायी, बहुजन समाज आणि धर्मनिरपेक्ष विचारांचे नागरिक लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक आंदोलनास बळ द्यावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांनी केले आहे. ही रॅली बौद्ध धम्माच्या रक्षणासाठी, सांस्कृतिक स्वाभिमानासाठी आणि ऐतिहासिक अन्यायाविरुद्ध एक प्रभावी पाऊल ठरणार आहे.

### डिजिटल मीडिया राज्य अधिवेशनाला उपस्थित रहा

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे. छत्रपती संभाजीनगरातील क्रांतीचौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मुख्य विश्वस्त एस एम देशमुख विश्वस्त किरण नाईक विश्वास शरद पाबळे राज्याचे अध्यक्ष सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे विभागाचे समन्वयक सुभाष चौरे राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे.

### छत्रपती संभाजीनगर येथील राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत बीडचे खेळाडू करणार प्रतिनिधीत्व



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे बीड जिल्हा स्पोर्ट कराटे असोसिएशनच्या वतीने रविवार दि.७ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन बीड जिल्हा स्पोर्ट कराटे असोसिएशन सचिव रामदास गिरी, उत्तरेश्वर सपाटे, मुसा शेख, दिनेश ढाकणे, अतुल चांदणे, पवन जोगदंड, अभिजीत राठोड, सार्थक डोंगरे, प्रीती प्रधान, यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेचे उद्घाटन संपन्न झाले. या जिल्हास्तरीय स्पर्धेमधील विजयी खेळाडू मुली ८ वर्ष वयोगटात कु. साईशा जेधे प्रथम क्रमांक तर कु. आरुषी आदमाने, अबोली दास (१० वर्षे) वयोगटात प्रथम क्रमांक यांनी प्रथम क्रमांक पटाकविला तर मुलांमधून १२ वर्षे वयोगटात प्रथम पुष्कर वळे, द्वितीय रुद्र वळे, स्वयंम जाधव, द्वितीय हर्षवर्धन बागुल यांनी पटकाविला. तर १२ वर्षे मुलींच्या वयोगटातून खेळतांना प्रथम पंकजा मुंडे,आरुषी जायभाय, द्वितीय प्रांजल शिंदे, प्रांजल सपाटे, द्वितीय तृतीय श्रेया राठोड यांनी उत्कृष्ठ कामगिरी केली. मुलांमधून १४ वर्षे वयोगटातून विविध वजन गटात खेळतांना प्रथम नैतिक शेळके, कार्तिक चौरे, द्वितीय पियुष गाडगे, तृतीय आदित्य ठोंबरे, श्लोक शिंदे, विशाल दराडे, द्वितीय गोविंद कुलकर्णी, तृतीय कृष्णा भुतडा यांनी बाजी मारली. तर १४ वर्ष वयोगटातून मुलीमधून प्रथम श्रेया भडके, सृष्टी जाधव, श्रुती शिरसेवाड, द्वितीय सिद्धी सोळंके, तृतीय शिवानी बाधडे या खेळाडूंनी कामगिरी बजावली.

### भिवा खाडे यांचे दुःखद निधन

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील भिवा बाबा खाडे यांचे दि. ६ रोजी सायंकाळी दुःखद निधन झाले वयाच्या ७० वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी मुलांना उच्चशिक्षित करून नोकरीला लावले.ते मनमिळाव स्वभावाचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्या जाण्याने परिसरामध्ये हळूहळू व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.७ रोजी सकाळी चिंचपुर येथील खाडे येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# रुईमध्ये मुलाबाळांसह महिलेला मारहाण

**तलवाडा । प्रतिनिधी**




गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत आसलेल्या रुई गावात गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये आपला सरपंच हिरोला पडतो भारी हे गाणं लावल्याने झालेल्या वादानंतर मुलाबाळांसह महिलांना बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या तिघां विरुद्ध तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबत पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील सिरसदेवी पासून जवळ असलेल्या रुई येथील वैजयंती राम नवले, पती राम नवले,

### कालिदास नवलेसह ३ जणांवर तलवाडा पोलीसात गुन्हा दाखल

मुलगा सुरेंद्र नवले, सून वैष्णवी सुरेंद्र नवले हे सहकुटुंब राहतात. दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता गावातील गणपती विसर्जन

करण्यात येत होते. त्यानिमित्त निघालेल्या मिरवणुकीमध्ये गावातील लोक नाचत असताना सुरेंद्र नवले हाही त्यात नाचत होता. यावेळी गावातील कालिदास माणिक नवले, योगेश राम नवले आणि प्रशांत ज्ञानेश्वर नवले सर्व राहणार रुई हे पण त्या ठिकाणी दारू पिऊन आले आणि नाचू लागले तेव्हा कालिदास माणिक नवले याणे आमचा सरपंच हिरोला पडतो भारी हे गाणे लावण्यासाठी सांगितले आणि ते गाणे वाजवणाऱ्याने लावले तेव्हा वैजयंतीबाई नवले यांचा मुलगा सुरेंद्र याने, गावात गणपती सार्वजनिक उत्सव आहे. यामध्ये राजकारण कशाला आणता ? असे म्हणताच कालिदास नवले याने त्याच्यासोबत वाद घातला. त्याचवेळी गावातल्या लोकांनी तो मिटवला. परंतु त्यानंतर रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान सुरेंद्र, त्याची पत्नी, वडील आई वैजयंतीबाई नवले या घरात असताना कालिदास माणिकनवले, योगेश राम नवले आणि प्रशांत ज्ञानेश्वर नवले हे सर्वजण घरात घुसले. त्यांच्या

▶ उर्वरित पान २ वर

हरित बीड अभियानाला हरताळ फासणाऱ्या जिल्हा कारागृह अधिक्षकावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाईसाठी

# जिल्हा कारागृहासमोर वृक्षप्रेमींची निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**




गेल्या महिन्यात हरित महाराष्ट्राच्या धर्तीवर हरित बीड अभियान पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा प्रशासनाकडून राबविण्यात आले. एका दिवसात तब्बल ३० लाख वृक्ष लागवड करण्यात आली आणि त्याची नोंद इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली.

परंतु, याच हरित अभियानाला तडा देत गणेश विसर्जनाच्या दिवशी बीड जिल्हा कारागृह आवारातील लिंब, चिंच, कवठ, शेवरी, वड यांसारखी ४०–५० वर्षे जुनी असलेली ५० हून अधिक झाडे बुंध्यापासून कापून टाकण्यात आली. त्याहून गंभीर बाब म्हणजे शासकीय मालमत्ता विक्रीची रीतसर प्रक्रिया न करता झाडे खाजगी वाहनाने विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

शासकीय कार्यालयाच्या आवारातच झालेली ही वृक्षतोड हा अत्यंत निंदनीय आणि गंभीर प्रकार असल्याने संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार जिल्हा कारागृह अधीक्षक यांच्यावर प्रशासकीय तसेच दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. झाडे लावा झाडे जगवा हरित बीड अभियानाला हरताळ फासणा–या जिल्हा कारागृह अधीक्षकांवर कारवाई झालीच पाहिजे आदी घोषणाबाजी करण्यात आली. यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कारागृहासमोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार

▶ उर्वरित पान २ वर

## आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांचे 'ओएसडी'पदी प्रा.डॉ.हमराज उईकेंची नियुक्ती

**डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार ; नवगण शिक्षण संस्थेमध्ये आहेत कार्यरत**



**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी प्रा.डॉ.हमराज उदयभान उईके यांची 'ओएसडी'पदी (विशेष कार्य अधिकारी) राज्य शासनाने नियुक्ती केली आहे. ते नवगण शिक्षण संस्था ▶ उर्वरित पान २ वर

## सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सन्माननीत

**बीड । प्रतिनिधी**



सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे वंचित उपेक्षित घटकातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी करत असलेल्या कार्ये , ऊसतोड कामगार, स्थलांतरीत कामगार ,विटभटी कामगार, भटके विमुक्त समाजातील लोक व एकल महिला व बालकांच्या हक्कांच्या संदर्भात करत असलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांना राष्ट्रीय भटके विमुक्त दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित राष्ट्रीय भटके विमुक्त दिनाच्या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी

▶ उर्वरित पान २ वर

## डॉ. भीमराव पिंगळे विद्यालयात शिक्षक दिन साजरा



**बीड । प्रतिनिधी**

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त सर्वप्रथम पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.आज शाळेत 'स्कूल डे' च्या निमित्ताने इ.१०वी च्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी इ.५वी ते इ.९वी च्या वर्गांना शिकवण्याचा अनुभव घेतला. सर्वांनी त्यांना खूप चांगला प्रतिसाद दिला.खेळीमेळीच्या वातावरणात सर्वांनी आनंद घेतला.स्कूल डे च्या मुख्याध्यापिका म्हणून कु. दिशा मेंगडे तर प्रमुख पाहुणे म्हणून कु.सोनाली जगताप तर कु. आर्या सुखवसे व कु.आदिती उबाळे यांनी उत्कृष्ट सुत्रसंचलन केले.सर्व सहभागींनी आपले मनोगत व्यक्त केले,व आलेले अनुभव सांगितले. शेवटी शाळेचे मुख्याध्यापक श्री. रोहिदास डोंगरदिवे यांनी अध्यक्षीय भाषणात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एस.टी. प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी : रामशेठ राठोड

**माजलगाव । प्रतिनिधी**



हैदराबाद गॅझेटमध्ये स्पष्ट नोंदी असतानाही बंजारा समाजाला अद्याप अनुसूचित जमाती (एस. टी.) प्रवर्गात न्याय मिळालेला नाही. त्यामुळे समाजातील तरुण शिक्षण, नोकरी व इतर संवैधानिक सुविधांपासून वंचित राहिला आहे. याच पार्श्वभूमीवर समाजनेते रामशेठ राठोड यांनी बंजारा समाजाचा समावेश एस.टी. प्रवर्गात करावा, अशी ठाम मागणी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे. रामशेठ राठोड म्हणाले की, हैदराबाद गॅझेटच्या दस्तऐवजामध्ये बंजारा समाजाची नोंद अनुसूचित जमाती प्रवर्गात झालेली आहे. परंतु स्वातंत्र्यानंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान महाराष्ट्रात या समाजाला एस.टी.चे आरक्षण मिळाले नाही. परिणामी समाजातील लाखो विद्यार्थी व युवकांना शैक्षणिक, प्रशासकीय, शासकीय नोकरी व स्पर्धा परीक्षांमध्ये मागासलेपणाला सामोरे जावे लागत आहे. आज बंजारा समाज शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागे पडत आहे. एस.टी.चा दर्जा मिळाला असता तर अनेक तरुणांना उच्च शिक्षणात व रोजगाराच्या संधींमध्ये आरक्षणाचा लाभ झाला असता राठोड यांनी या अन्यायाविरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त केली.त्यामुळे सरकारने गांभीर्याने घ्यावे आम्ही फक्त संविधानाने दिलेला हक्क मागतो आहोत. हैदराबाद गॅझेटचा दाखला सरकारसमोर ठेवला आहे. केंद्र व राज्य सरकारने तातडीने यावर सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा बंजारा समाजाला आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, ▶ उर्वरित पान २ वर

## दिलासा संस्था यवतमाळ यांचा एस बी आय ग्राम सेवा ते एस बी आय ग्राम सक्षम प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण विकास कार्य अविरत सुरू



**बीड । प्रतिनिधी**

एस बी आय फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्यातून २०१६ पासून धारूर तालुक्यात दिलासा संस्था अविरत समाज उच्चाटन आणि विकास करण्यासाठी काम करत आहे, जल संधारण, गावचे एकात्मिक विकास, कौशल्य विकास, आरोग्य, शिक्षण आणि आता शेतकरी विकास अश्या विषयांवर काम सुरू ठेवून गरजूं शेतकऱ्या ▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहरात गणेश मंडळांच्या माध्यमातून कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती मोहीम राबविली

**बीड । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील विविध गणेश मंडळांना भेट देत डेंगू, चिकनगुनिया आणि हिवताप यांसारख्या कीटकजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा हिवताप अधिकारी श्री. विजयसिंह शिंदे, जिल्हा पर्यवेक्षक श्री. संजय धस आणि बीड शहरातील आरोग्य सहाय्यक व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम राबविण्यात आली.

प्रत्येक गणेश मंडळामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व सदस्यांना कीटकजन्य आजारांची माहिती देण्यात आली. यावेळी लोकांना ऑडिओ क्लिप, व्हिडिओ क्लिप आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून डास नियंत्रणाचे उपाय समजावून सांगण्यात आले. विशेषतः गप्पी म



ासा आणि लारवा यांच्या कार्यावर भर देण्यात आला. गप्पी मासा हा डासांची अंडी खाणारा डासभक्षक मासा असून तो पाण्यामध्ये डासांची पैदास थांबवण्यास मदत करतो. यामुळे प्रत्येक घरामध्ये गप्पी मासा पाळावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच, घरातील पाणी साठवणाऱ्या भांड्यांची नियमित स्वच्छता, परिसरातील स्वच्छता, वापरात नसलेल्या टायर, नारळीकरवंटी, प्लास्टिकच्या बाटल्या, भंगार यांची योग्य विल्हेवाट आणि साचलेल्या पाण्याची निचरा करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळा, डेंगू चिकनगुनिया पळवा आणि गप्पी मासे पाळा, हिवताप टाळा अशा संदेशांच्या माध्यमातून लोकांपर्यंत प्रभावी आरोग्य शिक्षण पोहोचविण्यात आले. या मोहिमेत श्री. पठाण शगीर ▶ उर्वरित पान २ वर